रयत शिक्षण संस्थेचे,

# डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली)

## ता. पलूस, जि. सांगली

शुक्रवार, दि. १ एप्रिल, २०२२

# मराठी विभाग व सांस्कृतिक विभाग

## सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या ९२ व्या पुण्यतिथीनिमित्त

### 'सहृद मातृत्व रयतमाऊली सौ. लक्ष्मीबाई पाटील.'

### अहवाल

रयत शिक्षण संस्थेच्या उभारणी व जडणघडणीमध्ये कर्मवीर भाऊराव पाटील (आण्णा) सह त्यांच्या सहचारणी सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील (वहिनी) यांचेही मोलाचे योगदान राहिले आहे. त्यांच्या ९२ व्या स्मृतिदिनानिमित्त महाविद्यालयातील मराठी विभाग आणि सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'सहृद मातृत्व रयतमाउली सौ. लक्ष्मीबाई पाटील' या विषयावर ज्येष्ठ विचारवंत व्ही. वाय. पाटील (आबा) यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. वहिंनी रयत शिक्षण संस्थेच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांना मायेची ऊब दिली. स्वत:च्या कुटुंबाआधी या दांपत्यांनी विद्यार्थ्यांचा विचार केला. असल्याचे मत व्ही. वाय. आबांनी मांडले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. कदम लाभले होते. त्यांनी आपल्या मनोगतात रयत शिक्षण संस्थेच्या उभारणीत वहिनींच्या योगदानाचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भूगोल विभागप्रमुख डॉ. अशोक खाडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. स्वाती मगदूम यांनी केले; तर आभार प्रा. प्रतिभा पुदाले यांनी मानले. प्रस्तुत कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील अध्यापकांसह विद्यार्थी उपस्थित होते. सदर कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सांस्कृतिक विभागाची संयोजन समितीचे योगदान; तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांनी मौलिक मार्गदर्शन राहिले.

**निष्पत्ती :** महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या कार्याची ओळख पटली.

**लाभार्थी :५४**




विभागप्रमुख
मराठी विभाग

मराठी विभाग प्रमुख,
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय,
रामानंदनगर (बुर्ली), ता. पलूस, जि. सांगली.

प्राचार्य
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली)